MHST010004882026

<u>**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३०/२०२६ मधील निशाणी क्र.१ खालील आदेश.**</u>
(दिनांक १२.०६.२०२६ रोजी घोषीत)

सौ. रुचिरा श्रीपाद कुलकर्णी. ...... अर्जदार
विरुध्द
श्री. श्रीपाद प्रदीप कुलकर्णी. ...... सामनेवाला

अर्जदारातर्फे वकील. – श्री. ए.एस. फाळके.
सामनेवालातर्फे. – स्वतः

सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम २४ अन्वये वेगवेगळ्या न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे एकाच न्यायालयात चालण्यासाठी दिलेला आहे.

२. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, कराड यांचे न्यायालयात प्रलंबित असलेले एम.एच.पी.क्र.३७७/२०२४ आणि दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, फलटण यांचे न्यायालयात प्रलंबित असलेला फौ.कि.अर्ज क्र.४१९/२०२१ ही प्रकरणे एकमेकांशी निगडीत असून सध्या वेगवेगळ्या न्यायालयात प्रलंबित आहेत. तथापी परस्पर विरोधी निर्णय टाळण्यासाठी सदरील प्रकरणे एकाच न्यायालयात वर्ग करण्यात यावीत.

३. सामनेवाला यांनी प्रस्तुतकामी हजर होऊन निशाणी ७ अन्वये म्हणणे दाखल करुन अर्ज नाकारला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, फलटण व कराड न्यायालयातील वर नमुद दाखल प्रकरणे सामनेवाला यांचा उलटतपास घेणेसाठी प्रलंबित असून अर्जदार उलटतपास घेणेस मुद्दामहून टाळाटाळ करत आहेत. अर्ज मंजुर करावयाचा असल्यास एच.एम.पी.क्र.३७७/२०२४ मध्ये अर्जदाराच्या उदरनिर्वाहासाठी व जाणेयेणेच्या खर्चासाठी मंजुर केलेली अंतरीम पोटगी कमी करणेत यावी.

४. अर्जदार यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ खालीलप्रमाणे न्यायनिर्णय सादर

केले आहेत.

*१) एन.सी.व्ही.ऐश्वर्या वि।। सर्वना कार्तीक शा, ए.आय.आर.२०२२, सु.को.*

*२) रजनी किशोर परदेशी वि।। किशोर बाबुलाल परदेशी, ए.आय.आर. २००५, सु.को.*

*३) यास्मीन अंजुम वि।। रशीद खान, महा.लॉ जर्नल २०२३, मुंबई उच्च न्यायालय.*

५. सामनेवाला यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ निशाणी ११ अन्वये लेखी युक्तीवाद दाखल करुन खालीलप्रमाणे न्यायनिर्णय सादर केले आहेत.

*१) आनंदीता दास वि।। श्रीजीत दास, सुप्रिम कोर्ट २००६.*

*२) प्रिती शर्मा वि।। मनजीत शर्मा, सुप्रिम कोर्ट .*

*३) एन.सी.व्ही.ऐश्वर्या वि।। सर्वना कार्तीक शा, ए.आय.आर.२०२२, सु.को.*

*४) कुसुम शर्मा वि।। महिंदरकुमार शर्मा, दिल्ली हायकोर्ट २०१५.*

६. अर्जदार व सामनेवाला यांचा युक्तीवाद तसेच त्यांनी सादर केलेले न्यायनिर्णय आणि उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. सामनेवाला यांना फलटण न्यायालयात दाखल असलेल्या फौ.कि.अर्ज क्र.४१९/२०२१ चे कामी फलटण येथे हजर रहावे लागत असून त्यासोबतच एच.एम.पी.क्र.३७७/२०२४ प्रकरणी हजर राहणे गैरसोईची होईल असे म्हणता येणार नाही. अर्जदार या महिला असून त्यांची सोय विचारात घेता अर्ज मंजुर करणे योग्य होईल. तसेच दोन्ही प्रकरणातील पक्षकार व वाद विषय एकच असल्याने परस्पर विरोधी वाद टाळण्यासाठी न्यायाच्यादृष्टीने सदरील प्रकरणे जलद गतीने निकाली होणेकरीता एकाच न्यायालयात वर्ग करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

---3

**आ दे श**

०१. दि.कि.अर्ज क्र. ३०/२०२६ मंजूर करण्यात येत आहे.

०२. दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, कराड यांचे न्यायालयात प्रलंबित असलेले एम.एच.पी.क्र.३७७/२०२४ हे प्रकरण दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, फलटण यांचे न्यायालयात चालण्यासाठी व कायद्याप्रमाणे निकाली करण्यासाठी वर्ग करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

०३. प्रस्तुतची प्रकरणे पुन्हा वेगळी होणार नाहीत याची संबंधीतांनी काळजी घ्यावी.

०४. संबंधीत न्यायालयांना वरील आदेश कळविण्यात यावा.

ARVIND WAGHMARE

Digitally signed by ARVIND WAGHMARE
Date: 2026.06.12 16:13:10 +0530

(अरविंद शं. वाघमारे)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सातारा.

दिनांकः १२.०६.२०२६

---